क्रमांक : ३७.

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक १३ मे, २०२४ / वैशाख २३, शके १९४६

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

३७. विधानसभेचे सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन गुरुवार, दिनांक ०७ डिसेंबर, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या तृतीय सत्रात एकूण २६६ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. त्यापैकी १२४ निवेदने मंगळवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या पत्रक भाग- दोन क्रमांक ८ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली. आता एकूण १४२ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ४४ निवेदने सोमवार, दिनांक ०१ एप्रिल, २०२४ रोजीच्या पत्रक भाग- दोन क्रमांक २६ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली. आता एकूण ९८ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ०८ निवेदने शाखेत प्राप्त झाली. उर्वरित प्रलंबित ९० निवेदनांचा संबंधित मंत्रालयीन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच एम.के.सी.एल. तर्फे विकसित करण्यात आलेल्या MOIS या संगणकीय प्रणालीव्दारे सन्माननीय विधानसभा सदस्यांनी संपूर्णत: ऑनलाईन (online) पध्दतीने लक्षवेधी सूचना दिलेल्या असल्यामुळे सन्माननीय विधानसभा सदस्यांना ऑनलाईन (online) पध्दतीने उत्तर प्राप्त होणार असून उर्वरित प्रलंबित निवेदने प्राप्त झाल्यानंतर सर्व विधानसभा सदस्यांना पत्रक भाग-२ व्दारे अवगत करण्यात येईल.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १३ मे, २०२४**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

याची प्रत :

१. संगणक कक्ष (website.)
२. अनुवाद कक्ष
३. प्रतिवेदन

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे तृतीय अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक ४०३**

**श्री. अमिन पटेल, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. अस्लम शेख, श्री. झीशान सिध्दीकी, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. नानाभाऊ पटोले, श्रीमती सुलभा खोडके, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. संग्राम थोपटे, श्री. सुनिल केदार, श्री. रईस शेख,** वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबईमध्ये शेकडो किमीच्या भूमिगत मलवाहिन्या असणे, त्यांच्या सफाईसाठी मॅनहोलमध्ये माणसे उतरवली जाणे, मॅनहोलमधील विषारी वायुमुळे अनेक कंत्राटी कर्मचारी मृत्युमुखी पडणे, काही कर्मचाऱ्यांना श्वसनाचे जीवघेणे विकार जडणे, भूमिगत गटारात उतरून हाताने मैला साफ करण्यास बंदी असणे, मुंबई महापालिकेकडे आधुनिक व स्मार्ट तंत्रज्ञानावर आधारित यंत्रसामग्री उपलब्ध असताना देखील आजही सफाई कामगारांना मॅनहोलच्या घाणीत माणूस उतरवून भूमिगत गटारांची सफाई करण्यात येणे, भूमिगत गटारांमध्ये सफाई करताना गोवंडीमध्ये दोन कर्मचाऱ्यांचा मृत्यू होणे, कांदिवली येथे भूमिगत गटारातून सफाई करून बाहेर येताना कामगाराच्या अंगावरून गाडी जाणे, आतापर्यंत ४१ जणांचा भूमिगत गटारात पडून मृत्यू होणे, सफाई कामगारांच्या सुरक्षेसाठी कोणतीही प्रणाली किंवा साहित्य देण्यात न येणे, यामुळे सफाई कामगारांमध्ये असलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मलनि:सारण प्रचालन विभागामध्ये वाहनविराजित अत्याधुनिक यंत्रसामुग्रीच्या साहाय्याने (यांत्रिक पध्दतीने) मलनि:सारण वाहिन्यांचे परिरक्षण करण्यात येते. सद्य:स्थितीत १० विविध प्रकारच्या वाहनविराजित यंत्रांद्वारे सफाई करण्यात येते. तसेच, मलनि:सारण विभागामध्ये पूर्व उपनगरात २४, पश्चिम उपनगरात ३६ व शहर विभागात ३० अशी एकूण ९० वाहनविराजित यंत्रसामुग्री वापरण्यात येत आहे. सन २०१३ पासून हाताने मैला उचलणे प्रतिबंध कायदा अंमलात असल्याने मलनि:सारण प्रचालन खात्यामध्ये यांत्रिक पध्दतीने परिरक्षण करण्यात येते व कामगारांना सफाईसाठी मॅनहोलमध्ये उतरवले जात नसल्याने कोणत्याही कामगाराचा मृत्यू झालेला नाही. तसेच मलनि:सारण प्रचालन विभागातील सर्व कामगारांना वेळोवेळी रिफ्लेक्टींग जॅकेट, हेल्मेट, शेफ्टी शूज, हॅंड ग्लोंज, मास्क, इत्यादी सुरक्षिततेची साधने पुरविले जातात. मलनि:सारण प्रचालन विभागाचे स्वतंत्र प्रशिक्षण केंद्र असून त्यामध्ये सर्व कामगार/अधिकाऱ्यांना आरोग्य व सुरक्षेसंबंधित प्रशिक्षण दिले जाते.

शिवाजी नगर, गोवंडी येथील ९० फिट रोड क्र. १० येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नवीन मलनि:सारण वाहिनी टाकण्याच्या कामाकरिता मेसर्स ग्यान कंस्ट्रक्शन या कंपनीस दिनांक २६.०१.२०२१ रोजी कार्यादेश देण्यात आला. सदर कामासाठी २५ महिने (पावसाळा वगळून) इतका कालावधी देण्यात आला असून, कार्यादेशानुसार काम सुरू करण्याचा दिनांक २६.०१.२०२१ व काम संपविण्याचा दिनांक २८.०१.२०२४ असा आहे.

कंत्राटदार मेसर्स ग्यान कंस्ट्रक्शन कंपनीस दिनांक १०.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, चालू असलेले खोदकाम दिनांक १५.०५.२०२३ पर्यंत थांबवावे व त्यानंतर कोणतेही नव्याने खोदकाम करण्यात येऊ नये. तसेच खोदकामासाठी मारण्यात आलेल्या चरीच्या पुनर्पुष्टीकरणाचे काम दिनांक ३१.०५.२०२३ पुर्वी पूर्ण करण्यात यावे, असे कळविण्यात आले होते. तसेच, सदर पत्राच्या अनुषंगाने सदर कंत्राटदारास वारंवार सुचना देण्यात आल्या

होत्या. त्यानुषंगाने सदर कामाच्या व्याप्तीमध्ये असलेली ६०० मि.मी. व्यासाची मलनिःसारण वाहिनी (४३ मनुष्यप्रवेशिकांच्या बांधणीसहीत) टाकून, वाहिनी टाकण्यासाठी खोदण्यात आलेल्या चरीच्या पुनर्पुष्टीकरणाच्या कामासहित दिनांक १९.०५.२०२३ रोजी पूर्ण करण्यात आले होते. सदर काम हे दिनाक १९.०५.२०२३ रोजी पूर्ण झाल्यामुळे व येणारा पावसाळा (जून २०२३ ते सप्टें २०२३) पाहता कंत्राटदाराने हस्तांतरासाठी करावी लागणारी टेस्टींग, एजबिल्ट ड्रॉइंग, टोटल स्टेशन सर्व्हे अशी कोणतीही प्रक्रिया सुरु केली नव्हती. सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी दिनांक २८.०१.२०२४ असल्याकारणाने हस्तांतराची सर्व प्रक्रिया पावसाळयानंतर करणे अपेक्षित आहे/होते. त्यामुळे सदर कंत्राटदारास कोणत्याही कर्मचाऱ्यांकडून मनुष्यप्रवेशिका साफ करण्याच्या सुचना देण्यात आल्या नव्हत्या. पावसाळयात पुनर्पुष्टीकरणावर पडणाऱ्या खड्डयांना भरणे व तेथील रहीवाशांना/गाड्यांना त्याचा त्रास होऊ नये या दृष्टीकोनातून करावे लागणारे काम करणे हेच कंत्राटदाराने करणे अपेक्षीत होते.

दिनांक २४.०६.२०२३ रोजी ९० फिट रोड नं १० येथील मनुष्यप्रवेशिका नं. ३२ मध्ये कंत्राटदाराने दोन कामगार उतरले व त्यांचा मृत्यू झाला. सदर दुर्घटना घडली त्यादिवशी कामाच्या ठिकाणी कंत्राटदाराकडून सुरु असलेल्या कामाविषयी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मलनिःसारण प्रकल्प विभागास कंत्राटदाराने कोणतीही पूर्व सुचना दिलेली नव्हती. सदर प्रकरणी कंत्राटदारामार्फत मृत कामगारांच्या परिवारास प्रत्येकी रू. १० लक्ष इतके अर्थसहाय्य देण्यात आले आहे. सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी सुरु असून, सदर प्रकरणात महानगरपालिकेमार्फत कंत्राटदारास रुपये ५० हजार इतका दंड ठोठावण्यात आला आहे व त्यास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत काढण्यात येणाऱ्या निविदेतील अटी व शर्तीमध्ये कंत्राटदाराने काम करतेवेळी कामगारांच्या सुरक्षिततेकरिता रिफ्लेक्टींग जॅकेट, हेल्मेट, शेफ्टी शूज, हँड ग्लोज, मास्क इत्यादी सुरक्षिततेची साधने पुरविणे आवश्यक आहे. तसेच कामगारांच्या कल्याणाकरिता कंत्राटदाराने कामगारांचा विमा काढणे, किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे, बालकामगार कायद्यानुसार बालमजूर कामास न लावणे, भविष्य निर्वाह निधी देणे, कामगार भरपाई कायदा १९२३ अंतर्गत कामगारास भरपाई देणे इत्यादी बाबतच्या सर्व अटी कंत्राटात अंतर्भूत असतात. कंत्राटदाराने सदर अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक आहे.

दिनांक ११.०६.२०२३ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आर/दक्षिण विभागातील शुभशांती को.ऑ.हा. सोसायटी, डहाणुकरवाडी कांदिवली या खाजगी सोसायटीच्या पावसाळी गटाराचे झाकण उघडून गटाराची साफ सफाई करत असताना सदर सोसायटीतील वाहन अंगावर चढून एका खाजगी कामगाराच्या बरगडीस व मणक्यास जबर दुखापत झाली होती. सदर कामगारावर मालाड येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरु असतांना दिनांक २२.०६.२०२३ रोजी त्याचा मृत्यु झाला आहे. सदर प्रकरणी संबंधित ठेकेदार व वाहन चालकाविरोधात कांदिवली पोलीस ठाण्यात कलम २७९, ३३६, ३३८, ३०४ (अ) भा.द.वि. सह कलम १९६ मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा क्र ३८०/२०२३ गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

********

लक्षवेधी सूचना क्रमांक ४७१

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

श्री. राजेश एकडे, श्री. बाळासाहेब थोरात, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. बळवंत वानखडे, श्री. अमित झनक, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ४७१ पुढीलप्रमाणे आहे :-

"सन २०१७-२०१८ पर्यंत मालमत्ता कराचा एक रकमी भरणा करणाऱ्या करदात्यांना थकीत रकमेवर आकारण्यात आलेली शास्ती माफ करण्याबाबतचा प्रस्ताव पाठवण्याबाबतचा निर्णय नगरपरिषद ने घेतलेला असणे, नगरपरिषद मलकापूर यांनी शासनाकडे शास्ती मध्ये सूट माफी मिळण्याबाबत सविनय अर्ज सादर केलेला असणे, माननीय उपसंचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी माननीय कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग, मंत्रालय यांना पत्र देऊन थकीत रक्कम प्रदान करणे करता सूट देणेबाबत नगरपरिषद औद्योगिक नागरी अधिनियमाच्या कलम १६७(अ) नुसार असे अधिकार शासनास असल्याचे नमूद करणे, शासन स्तरावरून योग्य तो निर्णय घेण्याबाबत सह पत्रान्वये संदर्भीय केलेली असणे, मुख्याधिकारी, नगरपरिषद मलकापूर यांनी सादर केलेली शास्तीसह व शास्ती शिवाय मालमत्ता कर वसुलीचा अहवालानुसार मालमत्ता करांमध्ये शास्तीबाबत मोठ्या प्रमाणात करदात्यांमध्ये असंतोष असल्याबाबत निर्देशनास येणे, शासन स्तरावरून मालमत्ता करावरील शास्ती माफ झाल्यास निव्वळ मालमत्ता कर वसुली मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता असणे, थकीत कर वसुलीच्या रकमेवरील शास्ती माफ करण्याबाबत नगरपरिषद औद्योगिक नागरी अधिनियम कलम १६७ (अ) नुसार थकबाकीची रक्कम प्रदान करण्याबाबत सूट देण्याचे अधिकार राज्य शासनास असणे, त्यानुसार शास्तीची रक्कम माफ होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

.................................................................................................................................

मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

नगरपरिषद मलकापूर यांनी दिनांक ७/८/२०१४ रोजी मालमत्ता करासंदर्भात ठराव घेऊन ज्या मालमत्ता धारकांकडे मालमत्ता कर थकीत आहे, त्यांना महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम-१५० (अ) मधील तरतूदीनुसार, प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी अशा कराच्या २% इतकी रक्कम शास्ती म्हणून आकारण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार नगरपरिषदेने शास्तीच्या रक्कमेसह मालमत्ता धारकांना मालमत्ता कराची बिले देण्यात आली. दरम्यान शास्तीसह बिले भरण्यास मालमत्ता धारकांचा प्रतिसाद मिळाला नाही.

त्यानंतर नगरपरिषदने दिनांक १०/१०/२०१७ रोजी ठराव करुन, सन २०१७-२०१८ पर्यंत जे मालमत्ता धारक कराचा एकरक्कमी भरणा करतील त्यांना २% शास्ती न आकारण्याचा निर्णय घेऊन सदर ठरावानुसार प्रस्ताव शासनास सादर करण्याचा निर्णय घेतला. तथापि, सदर ठरावानुसार शासनास प्रस्ताव पाठविण्यात आल्याचे दिसून येत नाही. त्यानंतर पुन्हा नगरपरिषदेने दिनांक २६/१०/२०२१ रोजी ठराव पारित करुन सन २०२० मधील कोविड कालावधीत नागरिकांची आर्थिक स्थिती विचारात घेता, सदरची शास्तीची रक्कम कमी करण्यात यावी किंवा माफ करण्यात यावी आणि असा प्रस्ताव महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या

कलम-१६७ (अ) मधील तरतूदीनुसार शासनास असलेल्या अधिकारास अनुसरुन शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा, असा निर्णय घेतला. तथापि, सदर ठरावानुसार देखील नगरपरिषद मलकापूरने शासनास प्रस्ताव सादर केल्याचे दिसून येत नाही.

दरम्यानच्या कालावधीत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी, मलकापूर विधानसभा क्षेत्र यांनी दिनांक ९/२/२०२२ रोजी शासनास पत्र देवून नगरपरिषदेने केलेल्या ठरावानुसार शास्तीची रक्कम माफ करण्याबाबत शासन स्तरावरुन निर्णय होण्याची विनंती केली होती. तथापि, अधिनियमाच्या कलम-१६७ (अ) मधील तरतूदीनुसार जी व्यक्ती नगरपरिषदेने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार मालमत्ता कराच्या थकबाकीची रक्कम प्रदान करील, अशा मालमत्ता करधारकांना राज्य शासन मान्य करील अशी सूट देण्याची तरतूद आहे, थकबाकीची रक्कम न भरणाऱ्या मालमत्ता धारकांच्या संदर्भात सदरच्या तरतूदी लागू होत नाहीत. यासाठी अधिनियमाच्या कलम-१६९ नुसार संबंधीत मालमत्ताधारकांनी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली मालमत्ता कर अपिल समितीकडे अपील करणे हा पर्याय असल्याचे शासनाने दिनांक २४/३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बुलडाणा व मुख्याधिकारी, नगरपरिषद मलकापूर यांना कळविले.

दरम्यान मा.विधानपरिषद सदस्य तसेच मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बुलडाणा यांच्याकडे मलकापूर नगरपरिषदेच्या मालमत्ता करावरील शास्ती माफीबाबत केलेली विनंती विचारात घेऊन, जिल्हाधिकारी, बुलडाणा यांनी दिनांक १०/४/२०२३ रोजी बैठक घेऊन नगरपरिषदेने दिनांक २१/१०/२०२१ रोजी घेतलेल्या ठरावानुसार शासनास शास्ती माफीचा फेरप्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार दिनांक २६/५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव पाठविल्याचे दिसून येते. तथापि, नगरपरिषदेच्या दिनांक २६/१०/२०२१ रोजीच्या ठरावातील विनंती शासनाने अधिनियमातील तरतूदी विचारात घेऊन यापूर्वीच अमान्य केली आहे.

*****************************

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे तृतीय अधिवेशन**

**लक्षवेधी सूचना क्रमांक १०८३**

**श्री. सुनिल प्रभु**, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबईतील सांताक्रुझ (पूर्व) महापालिकेच्या एच/पूर्व विभागातील कोलेकल्याण गावात न.भू.क्र. २३६४ ते २३७७ या भूखंडावर डिसी रुल ३३(७) अन्वये पुनर्विकास प्रकल्पात मे. डॉल्फीन डेव्हलपर्स या कंपनीच्या विकासकाने पश्चिम उपनगरे कार्यालयात पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर करताना रस्त्याचे बाधित क्षेत्र महापालिकेस हस्तांतरीत न करता सुमारे १० कोटी रुपये किमतीचा एफएसआय हडप केल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक २२ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, विकासकाने बोगस ताबा पावती बनवून त्यावर एच/पूर्व विभागाच्या सहाय्यक अभियंता, परिरक्षण यांची खोटी स्वाक्षरी करुन सदरहू ताबा पावती प्रस्तावात सादर करणे, विकासकाने नियमानुसार बाधित रस्त्याचे ८३.०२ चौ.मी. अधिक ३५ टक्के फंजीबल चटईक्षेत्र मिळून बाजारभावानुसार १० कोटी रुपये किमतीच्या २५०० चौ.फू.क्षेत्र हडप करुन गैरव्यवहार करुन महापालिकेचे आर्थिक नुकसान करणे, याबाबत मंगला शिंदे, कार्यकारी संपादिका, तत्काल एक्शन राष्ट्रीय हिंदी समाचार पत्र यांनी दिनांक १० मे, २०२३ रोजी सहाय्यक महापालिका आयुक्त, एच/पूर्व विभाग कार्यालय यांना लेखी तक्रार केल्यानंतर सहाय्यक अभियंता, परिरक्षण एच/पूर्व यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाकोला पोलीस ठाणे यांना दिनांक २१ ऑगस्ट, २०२३ रोजी तक्रार करुनही अद्याप पोलीसांनी कारवाई न करणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

सदर प्रकरणी श्रीमती मंगला शिंदे यांचे दिनांक १०.०५.२०२३ रोजीचे तक्रार पत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एच/पूर्व विभागास प्राप्त झालेले नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे प्रमुख अभियंता (दक्षता) यांच्या शिफारशीनुसार व आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या मंजुरीने एच/पूर्व विभागाचे तत्कालीन सहाय्यक अभियंता (परिरक्षण) यांनी जारी केलेल्या रस्त्याच्या बाधीत क्षेत्राच्या ताबा पावतीची सत्यता पडताळून पहावी व सदर ताबा पावती बनावट / खोटी आढळल्यास महानगरपालिकेच्या विधी विभागाच्या सल्ल्याने विकासक मे. डॉल्फीन डेव्हलपर्स आणि वास्तुविशारद श्री. अनिल पाटील यांच्या विरोधात गुन्हा नोंदवण्याबाबत कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) यांनी एच/पूर्व विभागाच्या सहाय्यक आयुक्तांस दिनांक २३.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

सदर प्रकरणी एच/पूर्व विभागाचे सहाय्यक अभियंता (परिरक्षण) यांनी वाकोला पोलीस ठाणे येथे तक्रार केलेली असून, सदर प्रकरणी जबाब देण्याकरिता सहाय्यक अभियंता (परिरक्षण) हे दिनांक ०४.१०.२०२३ रोजी व्यक्तीश: वाकोला पोलीस ठाणे येथे उपस्थित होते. तथापि सदर प्रकरणी अधिक तपास असण्याच्या कारणास्तव वाकोला पोलीस ठाणे यांनी जबाब देण्याकरिता त्यांचेमार्फत पत्रव्यवहार करण्यात येईल असे कळविले होते. त्याअनुषंगाने वाकोला पोलीस ठाणे यांचेमार्फत अधिक चौकशीसाठी पोलीस ठाण्यात हजर राहण्याबाबत दिनांक २८.११.२०२३ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी यांनी दिनांक १६.०१.२०२४ रोजी चौकशीसाठी उपस्थित राहून सदर प्रकरणी आपला जबाब नोंदविला आहे. सदर प्रकरणी वाकोला पोलीस ठाणे यांचेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

********

लक्षवेधी सूचना क्र. २१४६

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २१४६ खालीलप्रमाणे आहे:-**

"भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मनपा शाळेचे इमारती, रस्ते व सार्वजनिक शौचालयांची पुनर्बाधणी महाप्रीतमार्फत करुन मिळणेसाठी महापालिकेने कित्येक वर्ष शासनाकडे पाठपुरावा करण्यात येणे, महात्मा फुले नविनीकरणीय उर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) यांनी १०० कोटीच्या वर निधी मंजुर केल्याने संबंधित अधिकाऱ्यांनी हे प्रकरण दाबुन ठेवणे, भिवंडी महानगरपालिकेला घरपट्टी पाणीपट्टी खेरीज कोणतेही उत्पन्न नसूनसुध्दा त्यांच्या मागण्या पूर्ण करित नसणे,परंतु महाप्रितचा निधी हा भिवंडी महापालिकेचा हक्काचा निधी असुन तो त्यांना मिळण्यासाठी शासन दरबारी अनेक अडचणींना सामोरे जावे लागणे, महाप्रितच्या माध्यमातून भिवंडी महापालिकेचे मंजुर झालेले १०० कोटीचा वरचा निधी तात्काळ मंजुर करुन उर्जा विभाग, नगरविकास विभाग यांनी उपाययोजना कराव्यात, शासनाने तात्काळ भिवंडी महापालिकेला निधी मंजुर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार महात्मा फुले नविनीकरणीय उर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) यांनी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील महानगरपालिका शाळेच्या इमारती, रस्ते व सार्वजनिक शौचालयांची पुनर्बांधणी करीता १०० कोटीच्या वर निधी मंजूर केला नसल्याची वस्तुस्थिती आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत प्रस्तावित प्रकल्प महाप्रित मार्फत राबविणेकामी दिनांक २२.०९.२०२३ रोजी महाप्रित सामंजस्य करार केला आहे. तसेच प्रधानमंत्री आवास योजना प्रकल्प व्यतिरिक्त कोणतेही इतर प्रकल्प राबविणे कामी महाप्रित कडे प्रस्ताव पाठविलेला नाही.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका. कार्यक्षेत्रातील १९ शाळा व ५७ सार्वजनिक शौचलायांची पुनर्बांधणी कामी महात्मा फुले नविनीकरणीय उर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) मार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन ही कामे महाप्रितमार्फत करुन मिळणेबाबत परवानगी देणेकामी शासनास प्रस्ताव सादर केला असून सदर प्रस्तावावर शासन स्तरावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

*******

लक्षवेधी सूचना क्र.१७५१

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे तृतीय ( हिवाळी ) अधिवेशन**

**श्री. कुणाल पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १७५१ पुढीलप्रमाणे आहे :-**

"धुळे तालुका व जिल्ह्यात उच्चशिक्षित तरुण व तरुणांची संख्या मोठ्या प्रमाणावर असणे, धुळे जिल्ह्यात शेकडो तरुण तरुणी स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून शासनाचा इतर शासकीय विभागात भरती होण्यासाठी प्रयत्नशील असणे, शासकीय विभागात नोकरी मिळेल या आशेने हजारो तरुण, तरुणी हे रात्रंदिवस अभ्यास करीत असणे, परंतु गेल्या ५ ते १० वर्षापासून शासन भरतीप्रक्रिया करीत नसणे, राज्य शासनाच्या सर्व शासकीय विभागात हजारो पदे रिक्त असून ७५ हजार रिक्त पदांची भरती करण्याचे शासनाचे नियोजन असणे, परंतु जाहिराती वेळेवर प्रसिद्ध न होणे, त्यामुळे बेरोजगारीच्या प्रमाणात प्रचंड वाढ होणे, धुळे तालुका व जिल्ह्यात अनेक तरुण-तरुणी पोलीस भरतीचा सराव, व अभ्यास करीत असणे, सन २०२४ च्या आत पोलीस भरती राबविण्यात यावी, अशी त्यांची मागणी असणे, तशा प्रकारचे निवेदन त्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींकडे दिलेले असणे, परंतु शासनाचे भरती प्रक्रिया करण्याकडे दुर्लक्ष होत असल्याने बेरोजगार तरुण, तरुणींमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, शासनाने तातडीने पोलीस भरती प्रक्रिया राबवून बेरोजगारांना दिलासा देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

**मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील ७५,००० रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येईल अशी घोषणा राज्य शासनाने केली आहे. त्यानुसार मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिपत्याखालील विविध संवर्गाच्या १,५३,६४० पदांची भरती प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. सदर भरती प्रक्रिया वित्त विभागाच्या पद भरतीच्या प्रचलित धोरणानुसार करण्यात येत आहे.

महाराष्ट्र पोलीस दलात पोलीस शिपाई संवर्गातील एकुण १,९८,६८० मंजूर पदे आहेत. कोविड विषाणुच्या प्रादुर्भावामुळे दि.०१.०१.२०१९ ते दि.३१.१२.२०१९ या कालावधीतील ५२९७ इतकी रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सन २०२१ मध्ये पूर्ण करण्यात आलेली आहे. तद्नंतर दि.०१.०१.२०२० ते दि.३१.१२.२०२१ या दोन वर्षातील पोलीस शिपाई संवर्गातील १८,३३१ रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली असून सदरहू भरती प्रक्रिया करताना कोविड-१९ सार्वत्रिक साथरोगामुळे दि.०१.०१.२०२० ते दि.३१.१२.२०२२ या कालावधीत ज्या उमेदवारांनी कमाल वयोमर्यादा ओलांडली आहे अशा सर्व प्रवर्गाच्या उमेदवारांना एक वेळची उपाययोजना म्हणून भरती प्रक्रियेसाठी पात्र करण्यात आले आहे. सद्यस्थितीत या १८,३३१ नवप्रविष्ठ पोलीस प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण केंद्राच्या क्षमतेनुसार दोन टप्प्यामध्ये प्रशिक्षण देण्याचे प्रस्तावित असून पहिल्या टप्प्याकरीता एकूण ८,५४० पोलीस प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले आहे. या प्रशिक्षणार्थींचे प्रशिक्षण फेब्रुवारी २०२४ मध्ये पूर्ण होत असून उर्वरीत प्रशिक्षणार्थींचे प्रशिक्षण मार्च २०२४ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत घेण्याचे नियोजन आहे.

धुळे जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवर सन २०१३, २०१४, २०१५-२०१६ ,२०१७, व २०१८ मध्ये भरती प्रक्रिया राबवून पोलीस शिपाई संवर्गाची पदे भरण्यात आली आहे. तसेच सन २०१९ मध्ये घेण्यात आलेल्या पोलीस भरती प्रक्रियेमध्ये धुळे जिल्हा पोलीस दलातील पोलीस शिपाई संवर्गाच्या १६ पदांचा व दिनांक ०१.०१.२०२० ते ३१.१२.२०२१ मधील पोलीस शिपाई संवर्गाच्या रिक्त पदांच्या भरती प्रक्रियेमध्ये ४२

पदांचा समावेश असून याव्यतिरिक्त २०२२ मध्ये अनुकंपा तत्वावरील ९ पदे भरण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

तसेच राज्य राखीव पोलीस बल गट क्र.०६, धुळे येथील सशस्त्र पोलीस शिपाई संवर्गाची ५९ पदे भरण्याबाबबत भरती प्रक्रिया राबविण्यात आली असून ५४ उमेदवारांना सशस्त्र पोलीस शिपाई पदावर नियुक्ती देण्यात आली असून त्यांना मुलभूत प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले आहे.

सद्यस्थितीत दि.०१.०१.२०२२ ते दि.३१.१२.२०२३ या कालावधीतील रिक्त झालेली पोलीस शिपाई संवर्गातील रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

******

लक्षवेधी सूचना क्र.२२५४

सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

सर्वश्री.सुरेश (राजूमामा) भोळे, श्री.नितिन अर्जुन (ए.टी.) पवार, श्री.निलेश लंके, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"जि. पालघर, वसई तालुक्यातील नागरिकांशी गैरवर्तणूक करणारे नायब तहसिलदार यांच्या बदलीसाठी तहसिलदार कार्यालयावर नागरिकांनी मोर्चा काढून तीव्र आंदोलन करणे, नायब तहसिलदार हे त्यांचेकडे विचारणा करणाऱ्यांना धमकाविणे, तक्रारदारांवर खोट्या तक्रारी दाखल करणे, महिलांना अर्वाच्च भाषेत बोलणे, ई.गैरवर्तणुकीमुळे जनतेत प्रचंड संताप निर्माण होणे, जिल्हाधिकारी आणि तहसिलदार यांचेकडे अनेकांनी तक्रारी करूनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कारवाई करण्यात न येणे, नायब तहसिलदार यांना लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी रंगेहाथ लाच घेताना अटक करूनही शासनाने त्यांची नायब तहसिलदार पदावर नियुक्ती करणे, वाडा आणि पालघर मध्ये महा-ई केंद्रामार्फत बनावट दाखले देऊन भ्रष्टाचार केल्याप्रकरणी नायब तहसिलदार यांना सेवेतून निलंबित करण्यात येवूनही पुढे त्यांची चौकशी करणेबाबत कोणतीच कारवाई करण्यात न येणे, पवार यांच्या कार्यालयात गौण खनिजच्या गाड्या पकडून अक्षय गोवठले या खाजगी व्यक्तीमार्फत वसुली केली जाणे, अशा अनेक मागण्या करण्यात येऊनही त्यावर कोणतीही कारवाई न झाल्याने मोर्चाचे आयोजन करण्यात येणे, नायब तहसिलदार यांच्यावर ज्या ज्या वेळी भ्रष्टाचाराचे आरोप झाले त्यावेळी त्यांनी वरिष्ठांबरोबर आर्थिक संगनमत करून आपली नोकरी सुरक्षित ठेवण्यात यशस्वी होणे, या सर्व प्रकारास त्यांचे वरिष्ठ असलेले तहसीलदार यांचाही पाठींबा असल्याचा संशय, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील,मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

श्री.चंद्रकांत पवार, निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय वसई, जि.पालघर यांची विविध तक्रारींच्या अनुषंगाने बदली करण्याबाबत तसेच जनतेच्या वतीने मोर्चा काढण्याबाबत जिल्हाधिकारी, पालघर यांना निवेदन प्राप्त झाले आहे.

संबंधित नायब तहसिलदार यांच्या कार्यपद्धतीबाबत स्थानिक नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी कामी उपविभागीय अधिकारी, वसई व तहसिल कार्यालय, वसई यांना जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांनी चौकशी करुन अहवाल सादर

करण्याकामी कळविले आहे. तसेच अशाच प्रकारचे तक्रारअर्ज विभागीय आयुक्त, कोकण यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाले होते. सदर तक्रार अर्जावर कार्यवाही करणेबाबत जिल्हाधिकारी, पालघर यांना कळविण्यात आले असून सदर तक्रार अर्जावर जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री.पवार, नायब तहसिलदार यांच्याकडे मुख्याधिकारी, विक्रमगड नगरपंचायत या पदाचा अतिरीक्त कार्यभार असताना त्यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत कार्यवाही करण्यात आलेली होती. त्यानुसार त्यांना शासन सेवेतुन निलंबित करण्यात आले होते. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार त्यांचा निलंबन कालावधी समाप्त करुन दिनांक ०४/०७/२०२२ रोजीच्या आदेशान्वये त्यांना शासन सेवेत नायब तहसिलदार या पदावर पुन:स्थापित करण्यात आलेले आहे. तथापि, सदर प्रकरणी विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांचेकडील दि.०४.१२.२०२० रोजीचे आदेशान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ चे नियम ८ अन्वये त्यांची विभागीय चौकशी सुरु आहे.

वाडा व पालघर तालुक्यामध्ये महा-ई सेवा केंद्रामार्फत बनावट दाखले देऊन भ्रष्टाचार केल्याप्रकरणी संबंधित नायब तहसिलदार यांना सेवेतून केव्हाही निलंबित करण्यात आले नसल्याचे किंवा त्यांचेविरुद्ध कोणतीही कार्यवाही सुरू अथवा प्रस्तावित नाही असे विभागीय आयुक्त,कोकण यांच्या अहवालात नमूद आहे.

युवाशक्ती एक्सप्रेस कार्यकारी संपादिका यांनी संबंधित नायब तहसिलदार यांचेविरूद्ध गौणखनिजाच्या गाड्या पकडून खाजगी इसमामार्फत वसूली केली जाते या आशयाच्या तक्रारी केलेल्या असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, वसई यांचेस्तरावर चौकशी सुरू असल्याचे विभागीय आयुक्त,कोकण यांच्या अहवालात नमूद आहे.

****************

लक्षवेधी सूचना क्र.२३४५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे तृतीय अधिवेशन

श्री.उदयसिंग राजपुत, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२३४५ पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबई-वडोदरा या ड्रीम प्रोजेक्टमध्ये भिवंडी तालुक्यातील अनेक गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी बाधित होणे, या जमिन मालकांना शेतजमिनीचा बाजारभावाप्रमाणे कोट्यावधी रुपयांचा मोबदला मिळत असतांना अनेक गैरव्यवहार नुकतचे समोर येणे, बनावट शेतकऱ्यांनी बळकावलेले ११ कोटी, आदिवासी वृध्द महिलेची फसवणूक करुन ५८ लाख रुपये बळकावल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात येणे, तसेच एका जमिन प्रकरणी शेतकऱ्यांची फसवणूक करीत तब्बल १६ कोटी रुपयांचा मलिदा भू-माफियाने लाटल्याचा प्रकार उघडकीस येणे, यासंदर्भात भिवंडी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे बाधित शेतकऱ्यांनी तक्रार करुन कोणतीच कारवाई न होणे, या संदर्भात कोणतीच कारवाई होत नसल्यामुळे बाधितांना मानसिक व शारीरिक तणाव होऊन त्यांच्या आरोग्यावरही परिणाम होणे, अशा प्रकारे यापूर्वीही अनेक प्रकरणात जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांचा निलंबनाचा प्रस्ताव सादर महसूल मंत्र्यांकडे सादर असतांना त्यांची सक्षम प्राधिकारी एस आर ए ३ या पदी नियुक्तीबाबतची टिप्पणी करुन मा. मुख्यमंत्री यांनी मंजूर करुन महसूल मंत्री यांच्या पाठविण्यात येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मुंबई -वडोदरा राष्ट्रीय महामार्ग या प्रकल्पाकरीता ठाणे जिल्हयातील भिवंडी, कल्याण व उल्हासनगर या उपविभागातील खाजगी जमिनीचे राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम १९५६ नुसार भूसंपादन करण्याचे काम संबंधित उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत करणेत येत आहे.

मुंबई-वडोदरा राष्ट्रीय महामार्ग या प्रकल्पांमध्ये ठाणे जिल्हयात बनावट कागदपत्रांच्या आधारे नांदिठाणे, तालुका भिवंडी येथील संपादित क्षेत्र १.७८२४ हे.आर या जमिनीच्या भूसंपादनाचा मोबदला रक्कम रुपये ११,६६,६४,६१४/- ही रक्कम बोगस व्यक्तींनी बनावट आधारकार्ड, ओळखीचे पुरावे व बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय यंत्रणेची फसवणूक करुन शासकीय रक्कम बेकायदेशीरपणे हस्तगत केल्याचे निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणी शांतीनगर पोलीस स्टेशन, भिवंडी येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा

गुन्हा आजमितीस न्यायप्रविष्ट आहे. तर, मौजे दुगाड, तालुका भिवंडी येथील सर्व्हे नंबर १२० ची भूसंपादनाचा मोबदला रक्कम रुपये ५८,४२,९९६/- ही रक्कम श्रीमती भागिरथी रामा मुकणे यांनी श्रीमती ठकी सख्या सवर या मयत आदिवासी महिलेच्या नावाने बनावट कागदपत्र सादर करुन शासकीय यंत्रणेची फसवणूक करुन शासकीय रक्कम बेकायदेशीरपणे हस्तगत केल्याचे निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणी शांतीनगर पोलीस स्टेशन, भिवंडी येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदरचा गुन्हा आजमितीस न्यायप्रविष्ट आहे.

तसेच, मौजे वडपे तालुका भिवंडी येथील स.नं.३६/२, ३६/३, ३६/४, ३४/१अ, ३७, ३६/८ हया जमिनींचे भूसंपादनाने बाधीत होणा-या क्षेत्राबाबत भारतीय नोंदणी कायदा, १९०८चे कलम १७ अन्वये नोंदणीकृत दस्त असल्याने व मालमत्ता हस्तांतरण कायदा, १८८२ चे कलम ५४ अन्वये मालमत्तेचा ताबा हा निवाडा घोषित होण्यापुर्वी बदलेला असल्याने सदर स.नं.च्या बाधीत क्षेत्राचा मोबदला संबंधित खातेधारकास अदा केलेला आहे.

सदर प्रकरणाच्या अनुषंगाने तत्कालीन संबंधित दोन्ही उप विभागीय अधिकारी यांना दिनांक ३०.१२.२०२२ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आलेले आहे.

तद्नंतर दि.०१.०६.२०२३ रोजीच्या शासन आदेशान्वये श्री. नळदकर यांना शासन सेवेत पुनःस्थापित करुन उप जिल्हा निवडणूक अधिकारी, गडचिरोली या पदावर पदस्थापना देण्यात आली आहे. तथापि, श्री. मोहन नळदकर हे अद्यापि उप जिल्हा निवडणूक अधिकारी, गडचिरोली या पदावर हजर झालेले नाहीत.

तसेच, सदर प्रकरणी सखोल चौकशी व्हावी म्हणून शासन परिपत्रक दिनांक २३.०२.२०२३ अन्वये मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली असून, समितीच्या कार्यकक्षेमध्ये सदर दोन प्रकरणे समाविष्ट आहेत. प्राप्त अहवाल, उपलब्ध अभिलेख, वस्तुस्थिती, कायदेशीर तरतुदी यांचा अभ्यास करुन प्रस्तूत प्रकरणी वस्तुनिष्ठ व अंतिम अहवाल शासनास दि.२२.०९.२०२३ व दि.०६.१२.२०२३ रोजी सादर करण्यात आलेले आहेत. सदर चौकशी अहवालाची छाननी चालू आहे.

---

लक्षवेधी सूचना क्र.२३४७

महाराष्ट्र विधानसभा
सन - २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

श्री.मंगेश कुडाळकर, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.

"सन २०२३ मध्ये ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग येथे कोतवाल भरती प्रक्रियेमध्ये श्रीमती दुर्वा अमित गंगावणे (रा.पिंगुळी (गुढीपूर) ता.कुडाळ, जि.सिंधुदूर्ग) यांच्यावर अन्याय झाल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये उघडकीस येणे, श्रीमती गंगावणे यांनी कोतवाल भरती प्रक्रिया जाहिरनाम्यानुसार त्यांनी कुडाळ तालुक्यातून अनुसूचित जमाती प्रवर्गातून सजा-वालावल कोतवाल पदासाठी अर्ज केलेला असणे, सदर पदासाठी दि.१० सप्टेंबर,२०२३ रोजी परिक्षा घेण्यात येऊन निकाल जाहिर करणे, सदर निकालानुसार श्रीमती अर्चना संतोष पवार यांना सजा-वालावल या ठिकाणी कोतवाल पदासाठी पात्र करण्यात येऊन कोतवाल पदाच्या निवडीसाठीच्या अटींची पूर्तता करीत नसतांनादेखील त्यांची नियुक्ती करण्यात येणे, श्रीमती पवार यांचा अर्ज तपासणी कर्मचाऱ्यांनी स्पष्टपणे शेरा ठेवून अपात्र केल्याचे आढळून येणे, तरीदेखील त्यामध्ये फेरबदल करुन श्रीमती पवार यांना जाणीवपूर्वक पात्र करण्यात आल्याची बाब निदर्शनास येणे श्रीमती पवार यांनी कुडाळ तालुक्यातील रहिवाश दाखला मिळविण्यासाठी तहसिलदार, कुडाळ यांच्याकडे खोटी कागदपत्रे सादर केल्याची बाब उघडकीस येणे, भरती प्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष, कोतवाल निवड समिती तथा उप विभागीय अधिकारी, कुडाळ यांच्याकडे असणे, त्यामुळे श्रीमती अर्चना संतोष पवार यांनी शासनाची दिशाभूल करणे तसेच त्यांची कोतवाल पदावर झालेली नियुक्ती रद्द करण्याची मागणी श्रीमती गंगावणे यांनी शासनाकडे करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

शासन पत्र दि.१७ मे, २०२३ अन्वये कोतवाल संवर्गातील रिक्त असलेल्या पदांच्या ८० टक्के मर्यादेत पदे भरण्यास "एक विशेष बाब" म्हणून कोतवाल पदे भरण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार अध्यक्ष,कोतवाल निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी, कुडाळ यांनी दि.१४.०८.२०२३ अन्वये तहसिलदार कार्यालय,कुडाळ व तहसिलदार मालवण यांच्या आस्थापनेवरील १४+१४ अशा एकुण २८ पदांकरीता कोतवाल पदभरतीची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली.

त्यासअनुसरुन तहसिलदार कार्यालय कुडाळ आस्थापनेवरील कोतवाल संवर्गातील एकुण १४ पदे भरण्यासठी दि.१४.०८.२३ ते २५.०८.२०२३ या कालावधीत उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. तलाठी सजा बांव येथील आरक्षणानुसार भटक्या जमाती-ड प्रवर्गातील अर्ज प्राप्त झालेला नसल्यामुळे सदरील पद रिक्त ठेवून उर्वरित १३ कोतवाल पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे.उपरोक्त कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन, प्राप्त अर्ज व त्यापैकी पात्र अपात्र उमेदवारांची यादी दि.२९.०८.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानंतर पात्र उमेदवारांचे परीक्षा प्रवेशपत्र दि.०४.०९.२०२३ व दि.०५.०९.२०२३ रोजी वितरीत करण्यात आले होते.

कोतवाल पदभरतीची लेखी परीक्षा दि.१०.०९.२०२३ रोजी घेण्यात येवून, प्राप्त गुणवत्तेनुसार

दि.११.०९.२०२३ रोजी अंतीम निवड यादी व प्रतिक्षा यादी अध्यक्ष कोतवाल निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी कुडाळ यांचे कार्यालयाकडून प्रसिध्द करण्यात आली आहे. निवड झालेल्या उमेदवारांची मूळ कागदपत्रे दि.१३.०९.२०२३ व १४.०९.२०२३ रोजी तपासण्यात आले आहेत. व निवड झालेल्या उमेदवारांना दि.१५.०९.२०२३ रोजी नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

वरील कोतवाल पद भरतीच्या प्रक्रियेमध्ये तलाठी सजा वालावल येथील आरक्षणानुसार अनुसूचित जमाती प्रवर्गातून ४ अर्ज प्राप्त झाले होते. १) श्रीमती अर्चना संतोष पवार यांना- ७० गुण २) श्रीमती दुर्वा अमित गंगावणे - ५० गुण देण्यात आले ३) श्रीमती राशी रामचंद्र ठाकूर हया परीक्षेस गैरहजर होत्या व ४) श्रीम.श्रमिका एकनाथ मसके यांचा दुबार अर्ज असल्यामुळे त्यांना अपात्र ठरविण्यात आले होते. श्रीमती अर्चना संतोष पवार यांनी रहिवाशी पुरावा म्हणून तहसिलदार कुडाळ यांचेकडील दि.२५.०८.२०२३ चा रहिवाशी दाखला, कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार कुडाळ ता.कुडाळ यांचेकडील दि.०२.१२.२०१७ चा वय व अधिवास प्रमाणपत्र तसेच आरोस बु. ता.कुडाळ जि.सिधुदूर्ग येथील दि.०६.०४.२०१९ च्या निवडणूक ओळखपत्राची प्रत हया पुराव्याच्या आधारे श्रीमती पवार यांचा रहिवास दिसून आल्याने त्यांचा अर्ज वैध ठरविण्यात आला आहे.

श्रीमती अर्चना संतोष पवार यांची गुणवत्तेच्या आधारावर तलाठी सजा वालावल या सजावर कोतवाल पदी नियुक्ती देण्यात आली. सदर पदावर श्रीमती अर्चना पवार हया दि.१५.०९.२०२३ रोजी तलाठी सजा वालावल येथे हजर झाल्या. त्यानंतर श्रीमती गंगावणे यांनी कोणत्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार घेतलेली नाही किंवा नोंदवलेली नाही.

तद्नंतर कोतवाल पदभरतीची संपूर्ण प्रक्रिया संपल्यानंतर दि.१६.१०.२०२३ रोजी श्रीमती गंगावणे यांनी श्रीमती अर्चना संतोष पवार यांच्या नियुक्तीवर हरकत घेऊन त्यानी नियुक्तीवेळी या कार्यालयाकडे दिलेला रहिवास दाखला खोटा असल्याबाबत हरकत/तक्रार दाखल केली आहे. प्राप्त हरकत/तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार कुडाळ यांनी दोन्ही पक्षकारांना नोटीस बजाविण्यात आली असून सदर प्रकरणी चौकशी सुरु करण्यात आली आहे.चौकशीअंती नियमोचित निर्णय घेण्यात येईल.

---